महाराष्ट्र शासन
महसूल विभाग

**उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, चिमुर यांचे कार्यालय**

प्रशासकीय ईमारत चिमुर
ता. चिमुर जि. चंद्रपुर
Pin-442903

फोन नं. 07170-265055
E-MailID: sdo.chimur@gmail.com

क्रं./कावि/प्रस्तु-3/2020/905 दिनांक:- 27/07/2020

वाचा:- 1. आपत्ती व्यवस्थापन कायदा-2005 चे कलम 34 (C) 34 (M)
2. भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम-1897
3. मा. जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर यांचे आदेश क्रमांक एमएजी/कार्या-8/टे-3/सांले/2020/600 दि. 17 जून, 2020
4. मुख्याधिकारी, न.पं. सिंदेवाही यांचे पत्र क्रं. कावि/नपचि/आरोग्य वि./2020/1868 दिनांक 27 जुलै, 2020

## // आदेश //

ज्याअर्थी, संपुर्ण महाराष्ट्रात कोरोना (Covid-19) या विषाणूचा प्रादुर्भावात वाढ झालेली असून या विषाणूमुळे उदभवणाऱ्या संसर्गजन्य आजारामुळे आरोग्य विषयक आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्याने राज्यात साथरोग अधिनियम, 1897 मधील खंड 2,3, व 4 ची अंमलबजावणी अधिसुचनेच्या दिनांकापासून लागू करुन मा. जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांना सक्षम प्राधिकारी घोषित करण्यात आलेले आहे.

ज्याअर्थी, चंद्रपूर जिल्हयात सदर विषाणुचा प्रादुर्भाव झाल्यास प्रादुर्भाव रोखण्याकरीता करण्यात येणाऱ्या विविध उपाययोजनेच्या अनुषंगाने जिल्हयातील कायदा व सुव्यवस्थेबाबत नियोजन व समन्वय, क्षेत्रिय स्तरावरील अडचणी सोडविणे, क्षेत्रियस्तरावर आदेश देणे, वाहतुक अडचणी असल्यास क्षेत्रीय स्तरावर संबंधितांना आदेश देणे व प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्याकरीता मा. जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी उपविभागीय, अधिकारी यांची **Sub-Divisional Incident Commander** म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे.

ज्याअर्थी, सिंदेवाही नगर पंचायत हद्दीतील **प्रभाग क्रं. 1 मधील जैस्वाल कॉलनी** या भागात कोरोना बाधित रुग्ण आढळून आल्याने व त्याचा प्रादुर्भाव शहरातील इतर भागात पसरु नये याकरीता सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने तसेच शहरातीलं नागरीकांचे हीत व सुरक्षेस्तव संदर्भिय आदेशाच्या अनुषंगाने अधिकच्या उपाययोजना तातडीने करणे आवश्यक आहे अशी माझी खात्री झाली आहे.

त्याअर्थी, सिंदेवाही नगर पंचायत हद्दीतील **प्रभाग क्रं. 1 मधील जैस्वाल कॉलनी** भागातील निश्चित केलेला कंटेनमेंट एरिया प्रपत्र नकाशाप्रमाणे व दिशाबाबत खालील तपशील प्रमाणे भाग दिनांक 27.07.2020 पासुन पुढील आदेशापर्यंत प्रतिबंधित क्षेत्र म्हणून घोषित करण्यात येत आहे.

**Containment Area :- नगर पंचायत सिंदेवाही, प्रभाग क्रं. 1**

- पुर्व - A- श्री. नंदकुमार देवाजी मडावी यांचे घर
- पश्चिम - B- श्रीमती. अश्मिता अरुण बेतावार यांचे घर
- उत्तर - C- सौ. सुनंदा भिमराव बोरकर यांचे घर
- दक्षिण - D- श्री. मुकेश लक्ष्मण पिलारे यांचे घर

Scanned with CamScanner

त्याअर्थी, मा. जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर यांचे संदर्भिय आदेश क्रं. 3 अन्वये मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन वरीलप्रमाणे परिघीय क्षेत्राच्या (Containment Zone Area) सिमा दिनांक 27.07.2020 पासुन पुढील आदेशापावेतो बंद करण्याचा आदेश देण्यात येत आहे.

सदर मनाई हुकूम आदेशाचे कालावधीत उपरोक्त क्षेत्रात पुर्वपरवानगीशिवाय कोणतेही आवागमनास परवानगी असणार नाही ही पुर्व परवानगी आवश्यक सेवा पुरविणाऱ्या पास धारकांना लागू राहील.

सिंदेवाही नगर पंचायत क्षेत्रातील **प्रभाग क्रं.1 मधील जैस्वाल कॉलनी (Containment Zone Area)** भागातील क्षेत्रात शासकीय कर्तव्यावर असलेले अधिकारी/कर्मचारी यांना अत्यावश्यक सेवेस्तव कर्तव्य करण्याची आवश्यकता, तातडीचे वैद्यकीय कारणे तसेच अत्यंविधी, वैद्यकीय सेवेशी संबंधित खाजगी डॉक्टर, नर्स, मेडीकल स्टोअर्स, दुकानदार, पॅथालोजिस्ट, रुग्णवाहिका यांना मुभा राहील. तसेच **तहसिलदार, सिंदेवाही / मुख्याधिकारी, नगर पंचायत, सिंदेवाही** यांचेकडून सदर प्रतिबंधित क्षेत्रात अत्यावश्यक सेवा पुरवठाधारकांना परवाना/पासेस निर्गमित करण्यात यावे आणि सदरहू परवाना/ पासेस धारकांची यादी संबंधित पोलीस स्टेशन अधिकारी यांना तात्काळ दयावी. सदरहू परवाना/पासेस धारकांना आवश्यक सेवा पोलीस स्टेशन अधिकारी यांनी नेमून दिलेल्या ठराविक वेळेत सकाळी 9.00 वा. ते दुपारी 2.00 वा. या कालावधीत पुरविण्याची मुभा राहील. तसेच सदरहु अत्यावश्यक सेवा पुरवठा करतांना सामाजिक अंतर Social Distancing चे व इतर आरोग्य विषयक नियमांचे पालन करण्याची जबाबदारी **तहसिलदार सिंदेवाही / मुख्याधिकारी, नगर पंचायत सिंदेवाही** यांनी त्यांच्या अधिनस्त कर्मचारी यांचेमार्फत करावी.

जे वरील आदेशांचे उल्लंघन करतील त्यांचेवर आपत्ती व्यवस्थापन अधिनियम-2005, भारतीय साथरोग नियंत्रण अधिनियम-1897, फौजदारी प्रक्रिया संहिता-1973 चे कलम 144, भारतीय दंड संहिता-1860 चे कलम 188 व इतर संबंधित कायदे व नियम यांचे अंतर्गत कार्यवाही करण्यात येईल.

27/7/20

(प्रकाश चं. संकपाळ)
उपविभागीय दंडाधिकारी,
चिमूर

प्रतिलिपी:-
1. मा. जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांना माहितीस सविनय सादर.
2. उपविभागीय पोलीस अधिकारी, ब्रम्हपूरी यांना माहितीस समादराने अग्रेषीत.
3. तहसिलदार, सिंदेवाही यांना माहितीस तथा उचित कार्यवाहीस अग्रेषीत.
4. मुख्याधिकारी, न.पं. सिंदेवाही यांना माहितीस तथा उचित कार्यवाहीस अग्रेषीत.
5. तालुका आरोग्य अधिकारी, सिंदेवाही यांना माहितीस तथा उचित कार्यवाहीस अग्रेषीत.
6. वैद्यकिय अधिक्षक, ग्रामीण रुग्णालय, सिंदेवाही यांना माहितीस तथा उचित कार्यवाहीस अग्रेषीत.

27/7/20

(प्रकाश चं. संकपाळ)
उपविभागीय दंडाधिकारी,
चिमूर

O/C

Scanned with CamScanner